# महाराष्ट्र राज्य कामगार विमा सोसायटी

**(महाराष्ट्र शासनाची नोंदणी क्र. GBBSD 488/2019 आणि F - ७५४४३ (M) अंतर्गत नोंदणीकृत स्वायत्त संस्था व भारत सरकार मार्फत दि. 25-10-2019 अन्वये मान्यताप्राप्त)**

**महाराष्ट्र शासन**

**मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कार्यालय**

पहिला मजला, रा.का.वि.सो. रुग्णालय वरळी, ग. जा. मार्ग, वरळी, मुंबई -18

**ई-मेल:** ceo.mhesis@gmail.com


क्र. मु.का.अ./महा- राकाविसो/ का.क्र ३/वाहन निर्लेखन/24243-45 /२०२६, दिनांक: 21 JUL 2026

**प्रति,**
संचालक, माहिती व तंत्रज्ञान संचालनालय
७ वा मजला, मंत्रालय, मुंबई – ४०००३२

विषय :- महाराष्ट्र राज्य कामगार विमा सोसायटी, मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कार्यालयातील ०१ शासकीय वाहन MH-०१-AN-०९१५ चे निर्लेखन पश्चात वाहन विक्री करण्याकरीता महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करणेबाबत.

संदर्भ :- १. या कार्यालयाचे पत्र क्र.१६२९८,दि.१३.०५.२०२६.
२. या कार्यालयाचे पत्र क्र.१९२३२-३४,दि,०४.०६.२०२६.

महोदय,

उपरोक्त विषयांस अनुसरुन संदर्भांकित पत्र क्र.०१ व ०२ अन्वये या कार्यालयातील ०१ शासकीय वाहन MH-०१-AN-०९१५ चे निर्लेखन पश्चात वाहन विक्री करणेबाबत महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. सदर कालावधी मध्ये वाहन विक्री करण्याकरीता निरंक निविदा प्राप्त झाल्या होत्या. तरी महाराष्ट्र राज्य कामगार विमा सोसायटी, मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कार्यालयातील ०१ शासकीय वाहन MH-०१-AN-०९१५ ची विक्री करण्याकरीता निविदा धारकांस निविदा पाठविण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर संदर्भांकित पत्रान्वये पुन:श्च जाहिरात प्रसिध्द करण्याची विनंती आहे.

**निविदा संदर्भात अटी व शर्ती खालील प्रमाणे :-**

१. मोहोरबंद पाकिटात निविदा प्रसिद्धीची जाहिरात दिनांकापासून ०७ दिवसापर्यत म्हणजेच दि.२७.०७.२०२६ पर्यत या कालावधीत सकाळी 11.00 ते 04.30 वाजेपर्यंत कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी मा. संचालक (प्रशासन), आयुक्त कार्यालय, राज्य कामगार विमा सोसायटी, पहिला मजला, रा.का.वि.यो रुग्णालय, वरळी, मुंबई – ४०००१८ येथे सादर करावी.

त्यावर **वाहन क्र.MH-०१-AN-०९१५ या वाहनाच्या विक्रीसाठी** असा स्पष्ट उल्लेख असावा.

२. जसे आहे तशा स्थितीत विक्रीकरीता असलेले वाहन आयुक्त कार्यालय, राज्य कामगार विमा सोसायटी, पहिला मजला, रा.का.वि.यो रुग्णालय वरळी, गणपत जाधव मार्ग, मुंबई – ४०००१८ या आवारात उभे करण्यात आले आहे. सदर वाहन निविदा सादर करणा-या इच्छुकाला निविदा कालावधीत या ठिकाणी पाहता येईल.

३. ज्यांना रजिस्टर पोस्टाने निविदा पाठवायची आहे, त्यांनी निविदा प्रसिद्धीची जाहिरात दिनांकापासून ०७ दिवसापर्यत म्हणजेच दि.२७.०७.२०२६ पर्यत या कार्यालयास पोहोचतील अशा बेताने पाठवावी, अन्यथा वरील कालावधीत समक्ष सादर करावी.

४. उद्योग, उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय दि.०१.१२.२०२६ अन्वये निविदाकारास निविदेत भाग घेण्याकरीता रुपये २०००/- इतके निविदा शुल्क (ना परतावा) आयुक्त कार्यालय, राज्य कामगार विमा सोसायटी, पहिला मजला, रा.का.वि.यो रुग्णालय वरळी, गणपत जाधव मार्ग, मुंबई – ४०००१८ या कार्यालयातील लेखा शाखेस जमा करणे बंधनकारक राहील. तसेच, रु.१०,०००/- इतकी बयाणा रक्कम (परतावा) या कार्यालयातील रोखपाल विभाग महा-राकावि सोसायटी, मुख्य कार्यकारी अधिकारी कार्यालय यांच्या नावाने काढलेल्या राष्ट्रीयकृत बँकेच्या धनाकर्षाच्या स्वरुपात निविदा लिफाफ्यामध्ये जमा करणे बंधनकाराक आहे.

५. रोख शाखा, आयुक्त कार्यालय, राज्य कामगार विमा सोसायटी, पहिला मजला, रा.का.वि.यो रुग्णालय वरळी, गणपत जाधवP मार्ग, मुंबई - ४०००१८ येथे इसा-याची रक्कम भरलेली पावती निविदा अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. इसा-याची रक्कम भरल्याचा पुरावा सोबत जोडला नसल्यास निविदा ग्राहय धरली जाणार नाही.

६. निविदा उघडण्याच्यावेळी निविदाधारक किंवा अधिकृत प्रतिनिधी यांना हजर राहता येईल.

७. यशस्वी निविदाकारास निविदा सफल झाल्याचे कळल्यापासून रोख रक्कम भरुन एका आठवडयात वाहनाचा प्रत्यक्ष ताबा घेणे आवश्यक आहे. अन्यथा त्यांची निविदा रददबातल ठरविली जाईल व इसा-याच्या रक्कमेस त्यास मुकावे लागेल.

८. यशस्वी निविदाधारकास, विक्रीकर अधिनियमानुसार वाहनावरील आवश्यक तो विक्रीकर भरावा लागेल किंवा वाहनावा प्रत्यक्ष ताबा मिळण्यापूर्वी कर भरल्याबाबतचा लेखी पुरावा सादर करावा लागेल.

९. यशस्वी निविदाधारक नियम व अटीनुसार करार पूर्ण करु शकत नसल्याचे दिसून आल्यास त्याने भरलेल्या इसा-याची रक्कम जप्त करण्यात येईल.

१०. मा. संचालक (प्रशासन), आयुक्त कार्यालय, राज्य कामगार विमा सोसायटी, पहिला मजला, रा.का.वि.यो रुग्णालय वरळी, गणपत जाधव मार्ग, मुंबई – ४०००१८ हे कोणतेही कारण न देता कोणतीही किंवा सर्व निविदा फेटाळू शकतात.

११. सदर वाहन हस्तांतरण नोंदणीबाबत सर्व प्रक्रिया यशस्वी निविदाकारास स्वखर्चाने करावी लागेल.

१२. प्रशासकीय किंवा तांत्रिक कारणास्तव वरील निविदा सादर करावयाच्या किंवा उघडण्याच्या वेळापत्रकात बदल होवू शकतो.

तसेच सोबत **निविदा प्रपत्र** (दरपत्रकासोबत सादर करावयाची कागदपत्रे) जोडण्यात येत आहेत.

(सोहम वायाळ)
**संचालक (प्रशासन)**
मुख्य कार्यकारी अधिकारी कार्यालय,
महा-राकावि सोसायटी, मुंबई – १८.

प्रत,

३. लेखा अधिकारी तथा सहायक संचालक (लेखा)

४. रोखपाल विभाग (या कार्यालयातील)

# निविदा प्रपत्र

दिनांक :-

वाहनाचा तपशील :-

| वाहन क्रमांक | वाहनाचा प्रकार | वाहनाचे मॉडेल वर्ष | इंधनाचा प्रकार | वाहनाची स्थिती | वाहनाची धावसंख्या |
|---|---|---|---|---|---|
| MH-01-AN-0915 | LMV Honda Mobilo 1.5 V (0) MT (I VTEC) | 2015 | Petrol | चालू स्थितीत | 1,51,941 कि.मी. |

## निविदा दर पत्रक

| अ.क्र | वाहन | वाहनाची हातची किंमत | निविदाकाराने नमूद करावयाची किंमत |
|---|---|---|---|
| १ | MH-01-AN-0915 LMV Honda Mobilo 1.5 V (0) MT (I VTEC) | १,३७,०००/- | |

❖ **दरपत्रकासोबत सादर करावयाची कागदपत्रे :-**

६. खरेदीदार यांचे ०२ पासपोर्ट साईज फोटो .

७. ओळखीचा पुरावा (पॅनकार्ड/अधाराकार्ड/पासपोर्ट/मतदार ओळखपत्र इ. कोणतेही एक)

८. कंपनी/फर्मच्या नावे वाहन खरेदी करावयाचे असल्यास त्याचे वस्तू व सेवाकर अंतर्गत नोंदणी असल्याचे प्रमाणपत्र.

९. इसा-याची रक्कम भरलेली पावती क्रमांक / छायाप्रत.

१०. निविदेची शुल्क रक्कम रु.२,०००/- भरलेली पावती क्रमांक / छायाप्रत.

**सोबत जोडलेली कागदपत्रे**

**निविदाकाराचे नाव :-**
**पत्ता :-**
**स्वाक्षरी :-**
**दुरध्वनी क्रमांक :-**